## व्दितीय श्रेणी बाष्पक परीचर परीक्षा,नागपूर, डिसेंबर-२०२४ करीता आवश्यक अर्हता व अनुभव

१. व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

२. उमेदवार हा कमीत कमी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अर्जासोबत माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र व गुणपत्रकाची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.

३. बाष्पक अधिनियम १९२३ प्रमाणे नोंदणीकृत असलेल्या बाष्पकावर फायरमन किंवा ऑपरेटर किंवा पंपमन किंवा वॉटरमन किंवा असिस्टंट फायरमन किंवा असिस्टंट ऑपरेटर या पदावर बाष्पक परिचरा च्या हाताखाली काम करण्याचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असावा. **किंवा**

जोडारी (फिटर) म्हणून बा ष्पक निर्मात्याकडे किंवा बाष्पक उभारण्याकरिता , बाष्पक चालविण्याकरिता किंवा बाष्पक दुरुस्तीकरिता कमीत कमी ३ वर्ष काम केलेले असावे व यापैकी असिस्टंट फायरमन म्हणून किमान १ वर्ष सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**किंवा**

आय.टी.आय. प्रमाणपत्र धारण करणा- या उमेदवारांना स्मॉल इंडस्ट्रियल बॉयलरवर (SIB) २ वर्ष काम करण्याचा अनुभव असणे अनिवार्य आहे.

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना.

(अत्यंत महत्वाच्या)

१. उमेदवाराने प्रपत्र-अ या नमुन्यामध्ये ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता https://exam.mahaboiler.in OR https://mahaboiler.in या संकेतस्थळाचा वापर करुन आपला अर्ज सादर करावा.

२. सर्वप्रथम उमेदवाराने अर्जासोबत अपलोड करणेकरीता (१) रंगीत पासपोर्ट फोटो (२) सही (३) दहावी उत्तीर्ण असल्याची मार्कशिट (४) दहावी बोर्ड प्रमाणपत्र (५) जन्म प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा दहावी बोर्ड प्रमाणपत्र किंवा ज्या प्रमाणपत्रावर जन्मतारीख नमूद असेल असे प्रमाणपत्र (६) राष्ट्रीयत्वाचा दाखला/पारपत्र/डोमिसाईल प्रमाणपत्र (७) शासकीय अथवा खाजगी वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या नोंदणी क्रमांकासहीत दिलेले मेडीकल सर्टिफिकेट (८) निरीक्षण अधिकारी यांनी पडताळणी केलेले व त्यांची सही व शिक्का असलेले सेवाप्रमाणपत्र (९) रुपये ३००/- परीक्षा शूल्क भरल्याचे चलन , इत्यादी कागदपत्रे ऑनलाईन प्रणालीमध्ये नमूद केलेल्या विहीत फॉरमॅट व साईजमध्ये स्कॅन करुन तयार ठेवावी.

३. सदर परीक्षेकरीता अर्ज सादर करण्यासाठी प्रथम उक्त संकेतस्थळावरुन यूजर नेम व पासवर्ड तयार करुन घ्यावा. यूजर नेम स्वत:चा मोबाईल नंबर असल्यामुळे यूजर अकाऊंट तयार करताना मोबाईल नंबर अचूकपणे भरावा . हा मोबाईल नंबर व पासवर्ड जत न करुन ठेवावा . कारण याच यूजर आयडीवर परीक्षेकरीता पात्र ठरल्यावर ऑनलाईन हॉल टिकीट येणार आहे , तसेच परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ऑनलाईन प्रमाणपत्र देखील येणार आहे . तदनंतर लॉग- इन करुन अर्जातील संपूर्ण माहिती भरावी . यूजर अकाऊंट तयार करताना उमेदवाराने एकदा वापरलेला मोबाईल क्रमांक पुन्हा वापरता येणार नाही.

कृ.मा.प.......२

४. उमेदवाराने स्वत:चे अलीकडील रंगीत छायाचित्र ज्याचे बॅकग्राऊंड पांढरे, त्याचा आकार हा ५० मी.मी.आडवा X ६५ मी.मी. उभा व ज्यामध्ये दोनही कान दिसत आहे असा पासपोर्ट साईजचा फोटो (जास्तीत जास्त ५०० KB व JPG/JPEG फॉरमॅटमध्ये) अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावा.

५. स्वत:ची स्कॅन केलेली सही (जास्तीत जास्त २० KB व JPG/JPEG फॉरमॅटमध्ये) स्पष्ट दिसत असल्याची खात्री करावी व अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावी.

६. उमेदवाराने अपलोड केलेला फोटो व सही हे उत्तीर्ण उमेदवाराला देण्यात येणा- या व्दितीय श्रेणी बाष्पक परीचर क्षमता परीक्षा प्रमाणपत्रावर प्रतिबिंबित (Reflect) होणार असल्यामुळे उमेदवाराने स्पष्ट दिसेल असा फोटो व सही अपलोड करावी.

७. ज्या प्रमाणपत्रात उमेदवाराची जन्मतारीख, त्याचे जन्मस्थळ व तो भारताचा नागरिक आहे असा उल्लेख केलेले व सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्र (Nationality Certificate) किंवा अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) किंवा पारपत्र (Passport) किंवा शाळा सोडल्याच्या दाखला ज्यामध्ये राष्ट्रीयत्वाच्या कॉलममध्ये भारतीय (Indian) असे नमूद असलेले यापैकी एक प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे

८. जे उमेदवार महाराष्ट्र राज्याव्यतीरीक्त अन्य राज्यातील डोमिसाईल प्रमाणपत्र सादर करतील त्यांना भारताचे नागरीकत्व असल्याबाबतचे व डोमिसाईल प्रमाणपत्र सत्य असल्याबाबतचे स्टॅम्पपेपरवर नोटराईज प्रतिज्ञापत्र/शपथपत्र अर्जासोबत अपलोड करावे.

९. अर्जात नमूद केलेले शैक्षणिक व इतर कागदपत्रे स्कॅन करुन स्पष्ट दिसत असल्याची खात्री केल्यानंतरच अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावी, जर शैक्षणिक व इतर कागदपत्रे अस्पष्ट दिसत असल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

१०. सेवा प्रमाणपत्र (अनुभवाचे प्रमाणपत्र) या कार्यालयाच्या संकेतस्थळावर ( www.mahaboiler.in) दिलेल्या नमुन्याप्रमाणेच कारखान्याच्या लेटरहेडवर असावे व त्यावर जावक क्रमांक व प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक , तसेच अनुभवाचा कालावधी नमूद केलेला असावा . यातील सर्व तपशील हा आपण ज्या विभागात कार्यरत आहात तेथील बाष्पक निरीक्षण करणा -या अधिका -याकडून पडताळणी केलेला असावा व त्यावर त्यांची सही व शिक्का असावा. असे सेवाप्रमाणपत्र स्कॅन करुन स्पष्ट दिसत असल्याची खात्री के ल्यानंतर अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावे.

११. अर्जामधील भाग-३ (ब) हा फक्त **साखर कारखान्यातील** बाष्पकावर काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारानीच भरावा.

१२. परीक्षेचे शुल्क रु. ३००/- gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावरुन भरताना, अर्ज कोणत्याही जिल्हयातून केला असेल तरीही **जिल्हा मुंबईच** निवडावा व शुल्क भरल्यानंतर चलन (PDF किंवा JPG/JPEG फॉरमॅटमध्ये) अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करावे.

कृ.मा.प.......३

१३. पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र त्यांच्या User ID वर ऑनलाईन पाठविण्यात येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने लॉग-इन करुन डाऊनलोड करावे व त्याची प्रिंट परीक्षेच्या वेळी सोबत घेऊन यावी . तसेच उमेदवाराने ओळखीच्या पुराव्याकरीता पॅनकार्ड किंवा आधारकार्ड किंवा कंपनीचे ओळखपत्र इत्यादी मुळ कागदपत्रे सोबत घेवून यावी.

१४. अर्जासोबत अपलोड केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे ही परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा उमेदवाराची परीक्षा घेतली जाणार नाही.

१५. अर्जातील कन्फर्म बटनावर क्लिक करण्यापूर्वी अपलोड केलेली प्रमाणपत्रे /कागदपत्रे इत्यादी स्पष्ट दिसत असल्याची खात्री करावी. अपलोड केलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे इत्यादी स्पष्ट दिसत नसल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल.

१६. अपलोड केलेल्या सर्व प्रमाणपत्राचा व सेवाप्रमाणपत्रांचा तपशिल अनुक्रमे अर्जामधील भाग-२ व भाग-३ मध्ये पुर्णपणे भरलेला असावा अन्यथा आपला अर्ज नाकारण्यात येईल.

१७. उमेदवाराने एकच अर्ज सादर करावा. सुधारीत अर्ज करावयाचा असल्यास दुसरे शूल्क भरणे आवश्यक राहील.

उपसंचालक, बाष्पके आणि सचिव,
परीक्षक मंडळ व परीक्षक समिती, महाराष्ट्र राज्य, मुंबई